# निवेदन

कोंकण विभागाच्या कृषि सेवक पदाच्या भरतीचा जाहिरात क्रमांक जाक्र/आस्था/कृषि ०१/०२/जाहिरात/सन २०१८-१९/४५, दिनांक ०३/०१/२०१९ जाहीरात प्रसिध्द करण्यांत आली होती. त्यानुसार कृषि आयुक्तालयाच्या अधिनस्त विभागीय कार्यालयांतर्गत कृषि सहाय्यकांची रिक्त पदे कृषि सेवक म्हणून निश्चित वेतनावर सरळसेवेने भरण्यासाठी दिनांक २२,२३ व २४ फेब्रुवारी २०१९ रोजी घेतलेल्या लेखी परिक्षेवर मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे दाखल केलेला मुळ अर्ज क्रमांक ५५८/२०१९ मध्ये झालेल्या दिनांक २२.८.२०१९ रोजी झालेल्या न्यायनिर्णय विचारात घेऊन तयार करण्यात आलेली विभागीय कृषि सहसंचालक, कोंकण विभाग, ठाणे या कार्यालयाची अनुसुचित क्षेत्रातील व क्षेत्राबाहेरील कृषि सेवकांची **अंतरिम** मेरिट यादी व निवड यादी **www.krishi.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर दिनांक २३/०८/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

त्या अनुषंगाने अनुसुचित क्षेत्राबाहेरील व अनुसुचित क्षेत्रातील अंतरीम निवड यादीतील निवड केलेल्या उमेवारांनी त्यांचेकडील कागदपत्रांची पडताळणी विभागीय कृषि सहसंचालक, कोंकण विभाग, कृषि भवन, रोड नंबर १६, झैंड लेन, वागळे इस्टेट, आशर आयटी पार्कजवळ ठाणे- ४००६०४ या कार्यालयात दिनांक-१६ ते २० सप्टेंबर २०१९ या कालावधीत करण्यात आली आहे. सदर कागदपत्र पडताळणी झाल्यानंतर तसेच महापरिक्षा पोर्टलद्वारे प्राप्त सुधारीत मेरीट यादीच्या अनुषंगाने संभाव्य अंतिम गुणवत्ता यादी तयार करून प्रसिध्द करण्यात येत आहे

१ सदर अंतिम यादी ही संभाव्य यादी असून त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार **मा. वि.कृ.स.सं. ठाणे** यांनी स्वतः कडे राखुन ठेवलेला आहे.

२ सदर संभाव्य अंतीम यादी बाबत कांही आक्षेप असल्यास सदर आक्षेपांची पुर्तता करून यादी आवश्यकतेनूसार फेरप्रसिध्द करण्या बाबत कोणतेही बंधन या कार्यालयास राहणार नाही.

३ सदर अंतिम व संभाव्य यादी या कार्यालयाकडील बिंदूनामावलीच्या अधिन राहून मंजूर करण्यात आलेली आहे.

४ सामन्य प्रशासनाच्या दिनांक ११/१२/२०१८ च्या शासन निर्णयानुसार सामाजिक व शैक्षणीक दृष्टया मागास प्रवर्गाचे आरक्षण १६ टक्के ऐवजी १३ टक्के करण्यात आल्यामुळे खुल्या प्रवर्गातील पदांच्या संख्येत वाढ होवून सदर पदे ३० ऐवजी ३३ भरण्यात आलेली आहेत.

५ सदर अंतिम यादी प्रसिध्द झाल्यापासुन उमेदवारांनी ८ दिवसात लेखी स्वरुपात आपले आक्षेप या कार्यालयास सादर करण्यात यावेत. त्यानंतर आलेल्या आक्षेपां बाबत कोणताही विचार करण्यात येणार नाही.

६ सदर यादीबाबत कोणतेही न्यायप्रविष्ठ प्रकरण उदभवल्यास, संबंधित कार्यालयास याबाबत पहिले अवगत करण्यात यावे. त्याबाबत होणारा निर्णय व विलंब यास हे कार्यालय व कार्यालय प्रमुख जबावदार राहणार नाहीत.

७ सदर यादी उमेदवारांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे व महापरिक्षा पोर्टल कडे सादर केलेल्या आवेदन पत्रा मधील माहीतीच्या आधारे व महापोर्टलने दिलेल्या निकालपत्रानुसार तयार करण्यात आली आहे.

८ सदर आवेदन पत्र व कागदपत्रामध्ये चुकीची माहीती सादर केल्यास त्याबाबत उमेदवारास जवाबदार धरण्यात येईल. व यामुळे उमेदवारांची निवड सुध्दा रदद करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

९ अनुसुचित जाती, जमाती, विजाअ व इतर मागास वर्ग (पेसा/अंशकालीन), महिला व बालकल्याण विभाग व इतर विभागाकडील कागदपत्र पडताळणी समीती यांचेकडून प्राप्त प्रमाणपत्रांच्या आधारे सदरची निवड करण्यात आलेली आहे. भविष्यात सदर प्रमाणपत्रांबाबत वरील समीतीकडून कोणत्याही प्रकारचा आक्षेप आल्यास उमेदवारांची निवड रदद करण्यात येईल.

१० सदर निवड यादीतील उमेदवारांची निवड ही जाहिरातीत दर्शविलेल्या शैक्षणिक पात्रता व वेळोवेळी शासनाने दिलेल्या शासन निर्णयानुसार सुचनांच्या आधारे करण्यात आलेली आहे. याबाबत पर्यायी अथवा सवलतींचा विचार करण्यात आलेला नाही.

११. सदर अंतिम अथवा संभाव्य यादी ही या कार्यालयाच्या निवड समितीच्या मान्यतेने प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

दिनांक- २३ /१२/२०१९

स्थळ - ठाणे

**(विकास पाटील)**
**अध्यक्ष तथा नियुक्ती अधिकारी**
**विभागीय कृषि सहसंचालक**
**कोकण विभाग, ठाणे -४.**